# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणमंडळ,

## पुणे विभागीय मंडळ,पुणे ४११००५

**परिपत्रक क्र.पुविमं/लेखा-१-२/नोंदणी शुल्क/सन २०२४-२५/ ४१७३ पुणे दिनांक ०५/ ०८ /२०२४**

**विषय- शैक्षणिक वर्ष २०२४-२५साठीचे नोंदणी शुल्क व शिक्षणसंक्रमण शुल्क भरणेबाबत . . .**

पुणे विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतीलपुणे/अहमदनगर/सोलापूर जिल्ह्यातील सर्व मंडळ मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येतेकी, सन **२०२४-२५** या शैक्षणिक वर्षाचे नोंदणी शुल्कखालील नमूद केलेल्या दराने इ.१० वी/इ.१२ वी च्या नियमित विदयार्थी संख्येप्रमाणे दिनांक **१० ऑगस्ट २०२४** पूर्वी या विभागीय मंडळाकडे बँक ऑफ इंडिया मध्ये दोन स्वतंत्र चलनाव्दारे जमा करण्यात यावे.

| नोंदणी शुल्क | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **EXAM** | **BANK NAME** | **A/C NO.** | **IFSC CODE** | | |
| **SSC** | **BANK OF INDIA** | ०५१७१०११०००५०५९ | **BKID०००५१७** | | |
| **HSC** | **BANK OF INDIA** | ०५१७१०११०००५०५८ | **BKID०००५१७** | | |

***नोंदणी शुल्क तक्ता***

| दिनांक | तपशील | नोंदणी शुल्क | |
|---|---|---|---|
| | | इयत्ता १० वी माध्यमिक शाळा | इयत्ता १२ वी कनिष्ट महाविद्यालय |
| दि.१० ऑगस्ट २०२४ पर्यंत | १ ते १०० विदयार्थ्यांकरिता | रुपये १०००/- | रुपये १०००/- |
| | त्यापुढील प्रत्येक १००विदयार्थ्यांसाठी | रुपये २००/- | रुपये ४००/- |
| दि.११ ऑगस्टते ३१ ऑगस्ट २०२४ | दंडात्मक शुल्क | रुपये २००/- | रुपये २००/- |
| दि.०१ सप्टेबर ते ३० सप्टेबर २०२४ | दंडात्मक शुल्क | रुपये ३००/- | रुपये ३००/- |
| दि.१ ऑक्टोबर नंतर नियमितविदयार्थ्यांची आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखेपर्यंत | दंडात्मक शुल्क | रुपये ५००/- | रुपये ५००/- |

**विशेष सूचना-**

१.नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क मंडळाकडे बँक ऑफ इंडीयाच्या चलनाद्वारेच स्वतंत्ररित्या भरणा करण्यात यावे.

२.नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्काचे चलन शुक्रवार.दि.३०/०८/२०२४ पर्यंत मंडळ कार्यालयात भरलेले चलन पोस्टाने किंवा हस्तपोच जमा करावे.

३.चलनातील सर्व माहिती परिपुर्ण भरुन चलनावर विद्यार्थी संख्येची नोंद आवश्यक आहे.

४.दि.१०/०८/२०२४ नंतर नोंदणी शुल्क भरल्यास नोंदणी शुल्क दंडासह दोन्ही एकत्रित शुल्क भरणे आवश्यक राहील.

५.नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क मंडळाकडे पाठवितांना सोबत पाठविलेल्या नमुन्यातील पत्रावर शाळा/ कनिष्ट महाविद्यालयांचा सांकेतिक क्रमांक, इ.१० वी./इ.१२ वी नियमित विद्यार्थी संख्या, चलन क्रमांक, दिनांक एकुण रक्कम व बँकेचे नाव इ.बाबी नमुद केलेल्या असाव्यात.

६.ज्या शाळा/ कनिष्ट महाविद्यालयांचे वर्ग संलग्न असतील अशा शाळा/ कनिष्ट महाविद्यालयांनी इ.१० वी./इ.१२ वी साठी स्वतंत्र रु.५००/- शिक्षण संक्रमण शुल्क भरणे आवश्यक आहे.

७ शि.सं..वर्गणीचा कालावधी माहे जुलै २०२४ ते जुन २०२५ असा राहील.

८.इ.१० वी व इ.१२ वी साठी फेब्रुवारी -मार्च २०२५ च्या परीक्षेकरीता प्राप्त होणारे नोंदणी शुल्क हे आपण भरलेल्या विद्यार्थी संख्या व मंडळाकडे प्राप्त नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रांची संख्या यांची पडताळणी करण्यात येणार आहे.तेव्हा नोंदणी शुल्क भरतांना सदर बाबींची मुख्याध्यापक/प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

९.तांत्रिक कारणास्तव चलनाद्वारे शुल्क जमा करता न आल्यास विहित मुदतीत मंडळ कार्यालयात समक्ष ONLINE CASH WINDOW प्रणालीवर ONLINE स्वरूपात जमा करण्यात यावे.(QR सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.)

१०.या व्यतिरिक्त ज्या शाळा/ कनिष्ट महाविद्यालयांना शिक्षण संक्रमणाचे जादा अंक पाहिजे असल्यास तसेच वैयक्तिक वर्गणीदार व इतर संस्था यांना आपली वर्गणी सचिव.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ. स.न.८३२-ए फायनल प्लॉट नं.१७८व १७९,बालचित्रवाणी,जवळ,आघारकर रिसर्च इन्स्टिटयुटमागे, भांबुर्डा,शिवाजी नगर पुणे-४११००४ या नावे डिमांड ड्रॉफ्टने पाठवावी.

वरील सर्व सूचनांची नोंद घेवून नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण अंकाचे शुल्क मंडळाकडे मागील वर्षाप्रमाणे पोस्टाने किंवा हस्तपोच पाठवावे.यासंबंधीचे चलन हे दि.१०/०८/२०२४ पुर्वी काढलेले असावे सदर दिनांकानंतर काढण्यात येणारे चलन दंडात्मक रकमेसह त्वरीत मंडळ कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.अन्यथा या संदर्भात कोणतेही स्मरणपत्र न पाठविता मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक रद्द करण्यातबाबत कार्यवाही करण्यात येईल. याची गांभियाने नोंद घ्यावी.

(औदुंबर उकिरडे)
**विभागीय सचिव**
**पुणे विभागीय मंडळ,**
**पुणे-४११००५**

प्रत-
१. मा.सचिव, राज्यमंडळ, पुणे
२. सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ट महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, पुणे/अहमदनगर/सोलापूर
३. विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग ४. शिक्षणाधिकारी माध्यमिक पुणे/नगर/सोलापूर

## * * नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क पाठविण्याचा नमुना **

नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्काची माहिती मंडळास सादर करतांना चलना सोबत
इ.१० वी व इ.१२ वी करीता प्रपत्र वापरावे.

| शाळा सांकेतांक | S | | | | | | | | दुरध्वनी/ भ्रमणध्वनी | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कनिष्ठ म.सांकेतांक | J | | | | | | | | | | | | | | | | | | |

जा.क्र./----------

दिनांक-----------

**प्रति,**

मा.विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११००४

**विषय-नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेबाबत..**

**संदर्भ-आपले परिपत्रक क्र.पुंविमं/लेखा/नों/शु./२०२४-२५/ ,दि. /०८/२०२४**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून इ.१० वी व इ.१२ वी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मंडळ मान्यता शुल्क व शिक्षण संक्रमण अंकाच्या शुल्काचे चलन या सोबत पाठविण्यात येत असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**नोंदणी शुल्क (इ.१० वी/ इ.१२ वी)**

सन २०२४-२५ करीता नोंदणी शुल्काचा तपशिल

| नियमित विद्यार्थी संख्या | बँकेचे नाव | चलन क्र./रोख पावती क्र. | दिनांक | रु. |
|---|---|---|---|---|
| | | | | १०००/- |

**शिक्षण संक्रमण अंक शुल्क (इ.१० वी/ इ.१२ वी)**

सन २०२४-२५ करीता शिक्षण संक्रमण शुल्काचा तपशिल

| नियमित विद्यार्थी संख्या | बँकेचे नाव | चलन क्र./रोख पावती क्र. | दिनांक | रु. |
|---|---|---|---|---|
| | | | | ५००/- |

स्वाक्षरी
मुख्याध्यापक/प्राचार्य
शाळा/कनिष्ठ महाविद्यालय शिक्का

टिप-
१.इ.१० वी/इ.१२ वी करीता शिक्षण संक्रमण अंकाचे बँक ऑफ इंडीयाचे चलन.वेगवेगळे पाठवावे
२.इ.१० वी/इ.१२ वी स्वतंत्र प्रपत्र पाठविणे आवश्यक आहे.
३.इ.१० वी/इ.१२ वी नोंदणी शुल्काचे चलन स्वतंत्र पाठवावेत.